**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. २१/२०१५** **दि. ०२.१२.२०१५**

| | |
|---|---|
| **श्री नुरुद्दीन जमालुद्दीन परकार**<br>**मु.पो. फुरुस**<br>**ता.खेड /जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय खेड** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. वि. रा. कांबळे,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री बशिर श.सनगे (प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. राजेंद्र बाबासो कदम**<br>**उपकार्यकारी अभियंता,**<br>**२) प्रदिप तुकाराम मोहिते**<br>**उच्चलिपिक उपविभाग खेड** |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन)] विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

१) श्री नुरुद्दीन जमालुद्दीन परकार (मयत) यांचे नांवे मु.पो. फुरुस ता.खेड जि.रत्नागिरी येथे महावितरणची वीज जोडणी असून ग्राहक क्र. २२१०५००००७७६ असा आहे. श्री नुरुद्दीन परकार यांचे नांवे असलेल्या जोडणीमधून श्रीमती आयशा इब्राहीम परकार या वीज वापर करतात गांव नमुना ७ गांव गावठाण ता.खेड मध्ये श्रीमती आयशा इब्राहीम परकार असे नांव दाखल आहे तसेच फेरफार पत्रकाप्रमाणे इब्राहीम जमालुद्दीन परकार यांचे मृत्युनंतर श्रीमती आयशा इ.परकार या वारस असल्याचे आढळते. मात्र वीज जोडणी त्यांचे नांवे बदलून घेतलेली नाही.

२) श्रीमती आयशाबी इ.परकार यांनी त्यांना देण्यात आलेल्या ऑगस्ट २०१५ च्या रु. ३००००/- देयकाबाबत 'अ' नमुन्यात दि. ०२.१२.२०१५ ची तक्रार दाखल केली आहे. तक्रारी समवेत ग्राहक श्री नुरुद्दीन जमालुद्दीन परकार यांचे मृत्युचे प्रमाणपत्र तसेच ७/१२ उतारा व फेरफार उतारा, वादग्रस्त देयक,आधार कार्ड इ. दस्तऐवज दाखल केले आहेत. तक्रारदार यांनी तक्रारी संबंधात सादर केलल्या कागदपत्रावरुन असे आढळते की या विषयीची लेखी तक्रार त्यांनी दि.२४.०९.२०१५ रोजी महावितरणकडे केली होती त्यानंतर २ महिन्यांच्या कालावधीनंतर मंचाकडे तक्रार केली आहे. आयोगाच्या विनियमातील कलम ६.२ च्या तरतुदी विचारात घेता मंचाकडे थेट केलेली तक्रार, मंच विचारात घेऊ शकते. तक्रारीचा क्रमांक २१ असा आहे. तक्रारीचे थोडक्यात स्वरुप असे आहे की, १ महिन्यात २४३९ युनिट वापराचे देयक आल्याने व प्रत्यक्ष वापर एवढया मोठया प्रमाणात कधीच नसल्याने देयकाला हरकत आहे. देयक मार्च ते ऑगस्ट २०१५ या कालावधीचे असल्याने ते योग्य आहे व वीज वापर ६ महिन्यामध्ये विभागून देण्यात आले आहे हे खेड उपविभागाचे उत्तर न पटल्यामुळे प्रस्तुत तक्रार करण्यात आली आहे.

३) तक्रारीची प्रत कार्यकारी अभियंता खेड यांचेकडे मंचाच्या दि.०२.१२.२०१५ च्या पत्र क्र. १५३ समवेत पाठविण्यात आली व तक्रारीसंदर्भात लेखी म्हणणे १० दिवसात सादर करण्यास कळविण्यात आले. कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या दि.११.१२.२०१५ च्या पत्र क्र.४१७४ अन्वये लेखी म्हणणे सादर केले.

४) (अ) आयोगाच्या विनियमातील तरतुदीनुसार पुरेशी लेखी व दूरध्वनीव्दारे पूर्वसूचना देऊन दि०६.०१.२०१६ रोजी सुनावणीसाठी उपस्थित रहाण्याविषयी कळविले. मात्र तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री बशीर श.सनगे यांनी त्यांचे जवळच्या व्यक्तिचे निधनामुळे सुनावणी पुढील आठवडयात घेण्याविषयी दूरध्वनीवरुन विनंती केल्याने कारण लक्षात घेऊन सुनावणी दि.१३.०१.२०१६ रोजी घेण्यात आली. याबद्दलची सूचना उभयपक्षाना देण्यात आली.

(आ) सुनावणीसाठी ग्राहकातर्फे श्री बशीर श.सनगे उपस्थित राहिले व त्यांनी दि.०६.०१.२०१६ रोजी उपस्थित न राहिल्याबद्दल पत्र दाखल केले. तसेच महावितरणतर्फे श्री राजेंद्र बाबासाहेब कदम उपकार्यकारी अभियंता खेड व श्री प्रदीप तुकाराम मोहिते उच्चस्तर लिपिक खेड उपविभाग उपस्थित राहिले.

(इ) श्री सनगे (प्रतिनिधी) यांनी ऑगस्ट २०१५ च्या अवास्तव रकमेच्या देयकाबाबत हरकत असल्याचे सांगितले. एप्रिल,मे व जून २०१५ च्या देयकांबाबत श्रीमती आयशाबी परकार यांनी विचारणा केली असता ग्राहकाची रक्कम जमा असल्याचे महावितरणच्या कर्मचाऱ्याने सांगितले व रक्कम भरण्याची गरज नाही असेही सांगितले. असे असताना ऑगस्ट २०१५ मधे अचानक २४३९ युनिटसाठी आकारणी करुन रु. ३०,०००/-चे देयक देण्यात आले. या देयकाबाबत खुलासा मागितला असता मार्च २०१५ मधे ग्राहकाकडील मीटर बदलला असला तरी त्या बदलाची संगणकातील नोंद विलंबाने झाल्याने मध्यंतरीच्या कालावधीत सरासरीने देयके दिली व ऑगस्ट मध्ये प्रत्यक्ष नोंदलेल्या वीज वापरासाठी देयक दिले असे महावितरणकडून सांगण्यात आले.

ग्राहकाने आक्षेप घेतल्यानंतर रु. १९६८०/- चे देयक दिले व ७० % रक्कम भरण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार यानी रक्कम २६ ऑक्टोबर २०१५ रोजी जमा केली. त्यानंतर उर्वरित रक्कमही जमा केली आहे.

सध्याच्या मीटरची तपासणी व्हावी यासाठी ग्राहकाने शुल्क जमा केले. तपासणीमधे मीटर अचूक असल्याचे आढळले. तेव्हापासून मासिक वापर सुमारे ९० युनिटस् नोंदलेला आढळतो.

तक्रारदार याना मार्च २०१५ चा मीटरबदलाचाअहवाल मिळावा व ऑक्टोबर २०१५ नंतर नोंदलेल्या वापरावर आधारित मागील ६ महिन्यांचे देयकात सुधारणा करावी अशी मागणी करण्यात आली मीटर बदलाच्या अहवालाच्या रजिस्टरमधील नोंदीची छायांकित प्रत तक्रारदार प्रतिनिधी यांस देण्याची मंचाने सुचना केली. श्री कदम यांनी पूर्तता करण्याचे मान्य केले. याप्रमाणे प्रत दिल्याचे उपकार्यकारी अभियंता खेड उपविभाग यांनी दि.१६.०१.२०१६ च्या पत्र क्र.११८ ने कळविले आहे.

(ई) महावितरणच्या वतीने श्री कदम उपकार्यकारी अभियंता खेड यांनी कथन केले की मार्च २०१५ रोजी ग्राहकाकडील वीज चोरी उघडकीला आली त्यावेळी मीटर बदलण्यात आला असून तोच मीटर आता ग्राहकाकडे आहे मीटर बदलाची नोंद संगणक प्रणालीमधे उशीरा करण्यात आली कारण शाखा कार्यालयाकडून मीटर बदलाचा अहवाल विलंबाने प्राप्त झाला. त्यामुळे मार्च ते ऑगस्ट २०१५ या कालावधीत सरासरीने देयके दिली गेली प्रत्यक्ष मीटर वाचन झाल्यानंतर ऑगस्ट २०१५ चे एकूण २४३९ युनिटचे देयक दिले व त्यामधे पूर्वी भरलेल्या रकमा वजा करुन स्लॅबचा फायदाही दिला आहे. वीज चोरीपैकी आधी जमा केलेली रक्कम नजरचुकीने देयकामधे समाविष्ट झाली होती त्याची दुरुस्ती करुन ग्राहकास सुधारित देयक देण्यात आले. तथापि ग्राहकाचे समाधान झाले नाही व स्वत:च ७० % रक्कम जमा करण्याचे मान्य करुन रक्कम रु. १४७२०/- जमा केले व त्यानंतर उर्वरित रक्कम जमा केली असल्याने तक्रारीस कारण शिल्लक नाही. ग्राहकाने रक्कम भरण्यासाठी हफ्त्यांची सवलत मागितली नाही त्यामुळे हफ्ते दिले नाहीत.

सरासरीने वारंवार देयक देण्याची बिलींग विभागाची कृती चुकीची व असमर्थनीय असल्याचे श्री कदम यांनी मान्य केले.

५) उभय बाजुंचे लेखी म्हणणे व दाखल केलेले दस्तऐवज पहाता असे आढळते की

क) ग्राहकाला दिलेले ऑगस्ट २०१५ चे देयक मार्च ते ऑगस्ट २०१५ या कालावधीचे एकत्रित वापराचे देयक होते हे महावितरणचे म्हणणे आहे.

ख) ग्राहकाकडील पूर्वीची देयके प्रत्यक्ष मीटर वाचनावर आधारित नसून सरासरीने दिली हेही महावितरणतच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे.

ग) ग्राहकाने वादग्रस्त देयकाची रक्कम जमा केली आहे याबद्दल वाद नाही. मात्र देयकाच्या आकारणीबद्दल ग्राहकाला आक्षेप असल्याने प्रस्तुत तक्रार दाखल केली आहे.

घ) ऑगस्ट २०१५ च्या देयकाबद्दल दि.२४.०९.२०१५ रोजी ग्राहकाचे नांवे तक्रार केली होती मात्र त्यावरील सही श्री बशीर श.सनगे यांनी केली आहे त्याआधीच्या दि.१६.०९.२०१५ च्या लेखी तक्रारीवर ग्राहकाचे सहीचे जागी 'नुज परकार' अशी सही आढळते. तसेच 'अ' नमुन्यावर ग्राहक म्हणून आ.इ.परकार अशी सही आढळते. तक्रारदार श्रीमती आयशाबी इब्राहीम परकार या ग्राहक श्री नुरुद्दीन जमालुद्दीन परकार यांच्या कायदेशीर वारस असल्याचा पुरावा/प्रतिज्ञापत्र सुनावणी दरम्यान प्रतिनिधी यांनी दाखल केलेले नाही.

ड.) दि. २४.०९.२०१५ च्या तक्रारीच्या उत्तरादाखल दि.२०.११.२०१५ च्या पत्र क्र. १९३१ अन्वये उपकार्यकारी अभियंता खेड उपविभाग यानी ग्राहक नुरुद्दीन ज. परकार यांचे नांवे पत्र पाठवून आवश्यक खुलासा केला आहे.

च) ग्राहकाच्या मागणीप्रमाणे दि.०६.१०.२०१५ रोजी वादग्रस्त मीटरची पडताळणी करण्यात आली त्याविषयीच्या दाखल झालेल्या अहवालावरुन मीटर अचूक असल्याचे आढळते. अहवालाबाबत तक्रारदार यांनी कोणताही आक्षेप नोंदविला नाही.

छ) जून २०१५ चे देयकाचे अखेरीस असलेली टीप पहाता असे दिसते की हे ४ महिन्यांचे देयक आहे. व ते सरासरीवर आधारित नाही. म्हणजे मार्च ,एप्रिल,मे व जून अशा महिन्यांची आकारणी यामधे आहे व पूर्वी भरलेली रक्कम रु. ७३६.८७/- ची वजावटही करण्यात आली आहे. त्यानंतर जुलै २०१५ मध्ये सरासरी वापराचे देयक दिले व ऑगस्ट २०१५ चे देयक २ महिन्यांसाठी (जुलै व ऑगस्ट) करुन रु. २७३.४४ ची वजावट करण्यात आली आहे.

ज) जुलै २०१५ च्या देयकावरील मीटरच्या छायाचित्राचे नीट अवलोकन केल्यास '२२३५' इतकी वीज वापराची नोंद आहे. असे असताना चालू रीडिंग या रकान्यात 'INACCS' असा उल्लेख असून सरासरी ६० युनिटचे देयक दिले आहे.अर्थात् ऑगस्ट २०१५ च्या देयकातील प्रत्यक्ष वीज वापर २४४० वजा २२३५ इतका म्हणजे २०५ युनिटस् २ महिन्यांसाठी होता हे स्पष्ट आहे. महावितणने मागील रीडिंग २२३५ युनिटऐवजी १ युनिट घेऊन आकारणी केल्याने अवास्तव आकारणी झाली असा समज होतो.

६) क) दिनांक १२ मार्च २०१५ रोजी नवीन मीटर बसविताना टेस्टिंग केल्याचे आढळत नाही. खेड उपविभागाने दि.२५.०१.२०१६ च्या पत्र क्र. १७२ प्रमाणे तपासणी क्र. व दिनांक याबद्दल कोणतीही नोंद करण्यात आलेली नव्हती व तशी नोंद उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. ग्राहकाच्या मागणीनंतर विलंबाने दि.०६.१०.२०१५ रोजी पडताळणी केली. मध्यंतरीच्या काळात मीटर सदोष झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मीटरची पडताळणी, आवश्यक वाटल्यास उत्पादक, मीटरचा MRI काढून अथवा NABL मान्यताप्राप्त लॅबोरेटरी यांचेकडून ग्राहकासमोर करुन घ्यावी. महावितरणच्या उपविभागाने एप्रिल २०१५ मधील अचानक नोंदलेल्या वाढीव वीज वापराबाबत त्वरीत शहानिशा करुन देयक सुधारित करणे आवश्यक होते व आहे.

ख )  वरील वस्तुस्थिती लक्षात घेता ऑगस्ट २०१५ चे देयक ६ महिन्यांसाठी असल्याचे उपकार्यकारी अभियंता खेड उपविभाग यांचे म्हणणे त्यांनीच दिलेल्या जून व ऑगस्ट २०१५ च्या देयकांशी विसंगत दिसते. दाखल झालेल्या देयकावरुन असे आढळते की,

i) जून २०१५ चे देयक ४ महिन्यांसाठी केले असले तरी बदललेल्या मीटरची नोंद करुनही नवीन मीटरच्या प्रत्यक्ष वापराप्रमाणे आकारणी केली नाही त्याऐवजी जुन्या मीटर क्र.९८७८९४ च्या आकारणी न झालेल्या ५३ युनिटसाठी आकारणी करण्यात आली. (१३८४-१३३१ = ५३)

ii) जून २०१५ च्या देयकात मार्च,एप्रिल व मे २०१५ च्या देयकापोटी जमा झालेल्या रक्कमेचे क्रेडीट देण्यात आले त्यामुळे जुनच्या देयकामध्ये रुपये ४५३.४०/- इतकी रक्कम क्रेडीट दाखविली आहे.

iii) जुलै २०१५ मध्ये प्रत्यक्ष वापराची युनिटस् (२२३५) उपलब्ध असूनही Inaccs असा शेरा लिहून सरासरीने देयक आकारणी केली. ऑगस्ट २०१५ मध्ये २ महिन्यांचे देयक केले असूनही आकारणी मात्र मार्च २०१५ पासून पुढील कालावधीसाठी २४३९ युनिटस्साठी करण्यात आली.

ग)  मंचाने महावितरणकडून मार्च २०१५ पासून पुढील प्रत्येक महिन्यातील मीटर रिडींगबद्दलचे मीटरचे छायाचित्र प्राप्त केले त्यानुसार ग्राहकाचा वीज वापर खालीलप्रमाणे आहे.

| **अनु.क्र** | **महिना** | **चालू रिडींग** | **मागील रिडींग** | **वीज वापर** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | मार्च | ८५ | ० | ८५+५३*=१३८ | * जुन्या मीटरचा वापर |
| २ | एप्रिल | १४४२ | ८५ | १३५७ | आकारणीसाठी २१६ युनिट |
| ३ | मे | १७७० | १४४२ | ३३२ | |
| ४ | जुन | १९४३ | १७७० | १७३ | |
| ५ | जुलै | २२३५ | १९४३ | २९२ | |
| ६ | ऑगस्ट | २४४० | २२३५ | २०५ | |
| ७ | सप्टेंबर | २६५३ | २४४० | २१३ | |
| ८ | ऑक्टोबर | २७३३ | २६५३ | ८० | |
| ९ | नोव्हेंबर | २८३४ | २७३३ | १०१ | |

**टीप :-** मे २०१५ ते ऑक्टोबर २०१५ सरासरी मासिक वापर २१६ युनिट

घ)  वरील प्रमाणे प्रत्यक्ष वीज वापर विचारात घेता असे आढळते की ग्राहकाचा वीज वापर एप्रिल २०१५ मध्ये १३५७ युनिटस् इतका अवास्तव नोंदलेला आहे. मे २०१५ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीतील सरासरी मासिक वापर २१६ युनिटस् होता. ऑक्टोबर २०१५ व नोव्हेंबर २०१५ मधील प्रत्यक्ष नोंदविलेला वापर अनुक्रमे ८० व १०१ युनिटस् आहे अशा स्थितीत एप्रिल २०१५ मधील १३५७ युनिटस्चा वापर सकृत दर्शनी अवास्तव दिसून येतो याविषयी महावितरणने कोणताही खुलासा केलेला नाही तसेच मार्च २०१५ मधील वीज चोरी प्रकरणीही महावितरणने आकारणीसाठी ११० युनिटस् मासिक वापर निश्चित केलेला होता हे दाखल केलेल्या असेसमेंट शीट वरुन स्पष्ट आहे त्यामुळे ग्राहकाकडील वीज वापराची

फेरआकारणी मार्च २०१५ व मे २०१५ ते ऑगस्ट २०१५ पर्यंत मीटरमध्ये नोंदलेल्या प्रत्यक्ष वीज वापरासाठी करणे आवश्यक असून एप्रिल २०१५ ची आकारणी १३५७ ऐवजी मे २०१५ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीतील सरासरी वापराप्रमाणे म्हणजेच २१६ युनिटस् साठी करुन अतिरिक्त वसूल केलेली रक्कम पुढील देयकात समायोजित करणे उचित व न्याय्य होईल. व नंतर एप्रिल२०१५ चे उर्वरीत म्हणजे १३५७-२१६= ११४१ युनिटस्ची आकारणी मीटरचे पुनश्च: फेरतपासणी नंतर करावी.

७) प्रस्तुत प्रकरणी मार्च २०१५ पासून पुढील देयक आकारणीमध्ये वीज वापराची आकडेवारी उपलब्ध असूनही अक्षम्य निष्काळजीपणा झाला आहे हे स्पष्ट असून त्यामुळेच ग्राहकाचा गैरसमज होउन ही तक्रार उद्‌भवली असेही मंचाचे मत आहे. या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यावर प्रशासनाने उचित कारवाई करावी अशी मंच शिफारस करीत आहे. भविष्यात प्रत्येक देयकावर रिडींग दिसेल अशा प्रकारचे मीटरचे स्पष्ट छायाचित्र छापण्याची काळजी घ्यावी.

८) तकारदार मयत ग्राहकाचा वारस असल्याचा ठोस पुरावा सादर न झाल्याने प्रस्तुत तक्रार फेटाळणे योग्य आहे तथापि दाखल झालेल्या हक्काच्या पत्रकाप्रमाणे व फेरफारपत्रकाप्रमाणे कुटुंब प्रमुख म्हणून श्री. नुरुद्दीन ज. परकार यांचे नावाची नोंद असल्याच्या व श्री. इब्राहीम परकार हे कुंटुबातील सदस्य असून तक्रारदार श्रीमती आयशा इब्राहीम परकार या त्यांची पत्नी असल्याच्या नोंदी आढळतात. श्री. नुरुद्दीन ज.परकार व इब्राहीम ज. परकार हे मयत आहे यास्तव मंचाने प्रस्तुत तक्रार विचारात घेतली आहे. मयत ग्राहक नुरुद्दीन ज. परकार यांचे अधिकृत वारसाचे नावे वीज जोडणी बदलून घेण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यानी आवश्यक कार्यवाही व पाठपुरावा करावा.

वरील सर्व विवेचनाअंती मंच खालील आदेश देत आहे.

## आदेश

**१) ग्राहकाची मार्च २०१५ ते ऑगस्ट २०१५ या महिन्यांची सर्व देयके रद्द करण्यात येत आहेत.**

**२) मार्च २०१५ व मे २०१५ ते ऑगस्ट २०१५ या महिन्यांची देयके नोंद झालेल्या उपलब्ध वीज वापराप्रमाणे सुधारित करावीत व एप्रिल २०१५ च्या देयकाची आकारणी २१६ युनिटस्साठी करावी.**

**३) क्रमांक २ वरील आदेशाप्रमाणे देयके सुधारित केल्यानंतर अतिरिक्त वसुली आढळल्यास ती पुढील देयकात प्रथम समायोजित करावी व नंतर एप्रिल २०१५ च्या देयकाची उर्वरीत (११४१ युनिटस्ची) आकारणी मीटरचे पुनश्चः फेरतपासणी करुन त्याच्या अहवालानुसार करावी.**

**४) तक्रारदार यांनी वा अन्य वारसाने श्री. नुरुद्दीन ज. परकार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत कागदोपत्री पुरावा देवून व अन्य पूर्तता करुन वीज जोडणी विनाविलंब आपल्या नावे बदलून घ्यावी.**

**५) मार्च २०१५ ते ऑगस्ट २०१५ या कालावधीतील बीलांची फेरआकारणी आदेशतील मुद्दा क्रमांक २ प्रमाणे दि.२९ फेब्रुवारी २०१६ पुर्वी करावी व त्याचा पुर्तता अहवाल १५ मार्च २०१६ पर्यंत मंचाकडे सादर करावा. व मुद्दा क्रमांक ३ मधील आदेशाप्रमाणे यथावकाश पुर्तता करुन पुर्तता अहवाल मंचास सादर करावा.**

**६) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**७) या आदेशाचे महावितरणकडून पालन न झाल्यास वीज कायदा २००३ मधील कलम १४२ नुसार ग्राहक खालील पत्त्यावर तक्रार करु शकतो.**

**पत्ताः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**१३ वा मजला, केंद्र क्रं. १,**
**जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,**
**कुलाबा मुंबई ४०००००५**
**फोन नं.०२२ - २२१६३९६४/६५/६९**

| | |
|---|---|
| **श्री .वि.रा. कांबळे** | **श्री ज.पु.बिवलकर** |
| **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- ०२.०२.२०१६**
**ठिकाण :- रत्नागिरी.**